Pune Police

# प्रेसनोट

## राज्य राखीव पोलीस दलाचा वर्धापन दिन सोहळा–2019

## राज्य राखीव पोलीस दल सुरक्षेची अभेदय भिंत: सुबोधकुमार जायस्वाल, पोलीस महासंचालकाचे प्रतिपादन

राज्य राखीव पोलीस दलाचा 71 वा वर्धापन सोहळा रामटेकडी येथील राज्य राखीव पोलीस बल गट क्र.1 पुणे येथे उत्साहात संपन्न झाला. प्रमुख अतिथी म्हणून महाराष्ट्र राज्याचे पोलीस महासंचालक श्री. सुबोधकुमार जायस्वाल हे होते. यावेळी राज्य राखीव पोलीस बलाच्या अपर पोलीस महासंचालक श्रीमती अर्चना त्यागी, पोलीस आयुक्त पुणे श्री व्यंकटेशन सो व पिंपरीचिंचवड चे पोलीस आयुक्त श्री पद्मनाभन, सीआयडीचे रविंद्र कुमार सिंघल, पुण्याचे माजी महापौर प्रशांतदादा जगताप, नागपुर परिक्षेत्राचे विशेष पोलीस महानिरीक्षक श्री. प्रसन्ना, राज्य राखीव पोलीस दलाचे उपमहानिरीक्षक डॉ. बी जी शेखर, पुण्याचे अपर पोलीस आयुक्त, सुनिल ब फुलारी, राज्य राखीव पोलीस दलाचे पोलीस अधीक्षक अशोक मोराळे, सर्व वाहिन्याचे प्रतिनिधी हजर होते.

राज्य राखीव पोलीस दलाची स्थापना पुणे जिल्हयातील पुरंदर किल्ल्यावर दि.06 मार्च 1948 रोजी झाली आहे. आज राज्य राखीव पोलीस दलात एकुण 16 गट कार्यरत आहेत. राज्य राखीव पोलीस दलात पोलीस जवानांच्या खेळांबरोबरच त्यांच्या कलागुणांना वाव देवुन जवांनाना चांगल्या कामासाठी प्रोत्साहित करुन अंतर्गत सुरक्षा बंदोबस्त व कायदा व्यवस्था व नक्षल बंदोबस्ताची महत्वाची कामगिरी सोपविण्यात येते. हे जवान वर्षातील 365 पैकी जवळ जवळ 250 दिवस कुटुंबापासुन दुर राहुन आपल्या पदाचे काम करतात.

सध्या राज्य राखीव पोलीस दलाचे जवान मेघालय, नागालॅंड, मिझोरम येथे निवडणूक बंदोबस्ताकरीता कार्यरत आहेत. नक्षलवादांचा बिमोड करणे कायदा सुव्यवस्था व राज्यात शांतता प्रस्थापित करण्याची महत्वाची जबाबदारी राज्य राखीव पोलीस बल पार पाडते.

राज्य राखीव पोलीस दलाच्या दैदीप्यमान कामगिरीचा उंच आलेख पाहुन 06 मार्च 2003 रोजी राज्य राखीव पोलीस बल गट क्र.1 पुणे येथे राज्य राखीव पोलीस दलास स्वतंत्र ध्वज तत्कालीन राज्यपाल श्री मोहमद फजल यांचे हस्ते अलंकरन परेड समारंभात प्रदान करण्यात आला. राज्य राखीव पोलीस दलाच्या दैदीप्यमान कामगिरीचा आलेख पाहता राज्य राखीव पोलीस दलाने सन 2017–19 ची गट परिसर स्वच्छता पदक ट्रॉफी सलग 3 वर्षे गट क्र.1 पुणे यांचेकडे आहे. भूमी कला स्पर्धेत राज्य राखीव पोलीस बल गट क्र.11 यांना प्रथम क्रमांकाचे मानांकन मिळाले आहे. स्मार्ट अधिकारी म्हणून पुण्यातील रमेश वेठेकर व औरंगाबादचे राजेंद्र राउत यांना गौरविण्यात आले.

राज्य राखीव पोलीस दलाचे वर्धापन दिनानिमित्त विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. पोलीस महासंचालक श्री. सुबोधकुमार जायस्वाल म्हणाले कि, राज्य राखीव पोलीस दल हे अत्यंत शिस्तीचे व उल्लेखनिय कामगिरी करणारे दल आहे. राज्य राखीव पोलीस दलाच्या पाईप बॅंड पथकाने सलग 3 वर्ष सर्वसाधारण विजेतेपद मिळवून देवून महाराष्ट्र पोलीस दलाच्या लौकिकात मोठी भर घातली आहे.

राज्य राखीव पोलीस दलाच्या वतीने पुणे ते नागपूर सद्भावना सायकल रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. या रॅलीत 180 पोलीस अधिकारी/कर्मचारी यांनी सहभाग नोंदविला त्यांनी 1017 कि.मी अंतर पार करुन सामाजिक, आरोग्य, सांस्कृतिक तसेच बेटी बचाओ, पाण्याचे महत्व, ग्लोबल वार्मींग, पोलीस दलाचे कामकाज, राज्य राखीव पोलीस दलाची भूमिका इ. महत्वपुर्ण विषयावर या रॅलीने जनजागृती करुन प्रबोधनाचे काम केले.

वर्धापन दिनाच्या औचित्याने राज्य आपत्ती प्रतिसाद पथकाच्या स्पर्धा घेण्यात आल्या होत्या, त्यांचाही बक्षिस वितरण करण्यात आले. तसेच महाराष्ट्राचे आपत्ती व्यवस्थापनाबाबत प्रात्यक्षिक व माहिती देण्यात आली.

सहायक समादेशक सुभाष सोनवणे व दिलीप खेडेकर यांनी हर्ष कवायतीचे प्रमुख म्हणून संचलन केले. पोलीस निरीक्षक महादेव गवारी, सतीष क्षिरसागर, ईश्वर चौधरी, खोसेकर, बाळासाहेब लोहार, रमेश वेठेकर, राजेंद्र राउत यांनी संचलनात दस्त्याचे नेतृत्व केले. तब्बल 16 वर्षानंतर पुण्यनगरीस या संचलनाचा मान मिळाला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक वाचन अपर पोलीस महासंचालक श्रीमती अर्चना त्यागी, भा.पो.से, यांनी केले. कार्यक्रम नियोजन समितीमध्ये डॉ.बी.जी.शेखर, पोलीस अधीक्षक श्री. अशोक मोराळे, समादेशक अरविंद चावरीया, रामकुमार, श्रीकांत पाठक, तानाजी चिखले, रामचंद्र केंडे, मर्गज, पौर्णिमा गायकवाड यांनी धुरा सांभाळली. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन डॉ.बी.जी. शेखर यांनी केले. सुत्रसंचालन दत्तात्रय निकम व सिताराम नरके यांनी केले.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सहायक समादेशक श्री.राजेंद्र मोरे, बी.एस.महाडीक, रविंद्र महापदी, सादीकअली सैयद, इन्नुस कादरी, पोलीस निरीक्षक बाळासाहेब पाटील विठ्ठल पाटील व अशोक देशमुख तसेच गटातील सर्व पोलीस अधिकारी/कर्मचारी यांनी विशेष परिश्रम घेतले.





